MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १२ अंक : २ पाने : १२ फेब्रुवारी-मार्च २०१८ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

*प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,*

स्त्री-पुरुष समानता म्हणजे काल जी कामे पुरुष करत होते, ती आज स्त्रिया करू लागल्या आहेत, असे नसून स्त्री कुठे कमी नाही, याचा एक विश्वास निर्माण करणे होय. त्यामुळेच यावेळच्या आठ मार्च या महिला दिनानिमित्त अनेक संस्था आणि सरकारी कार्यालयात पारंपरिक पुरुषांची ही कामे स्त्रियांनी अतिशय समर्थपणे करून दाखविली आहेत. अगदी वैमानिकासह सर्व महिला कर्मचारी असलेले विमान उड्डाण आपण पाहिले आणि लष्करातही महिला स्वतंत्रपणे जोखीमीची कामे पार पाडत आहेत, असेही दिसले. आपल्याही कंपनीत वाशी परिमंडळातील कळवा मंडळ अंतर्गत येणारे २२० के.व्ही.ऐरोली नॉलेज पार्क हे महिला उपकेंद्र म्हणून आपण ओळखतो आणि त्याला यादृष्टीने विशेष महत्त्व आहे.

- *महिला दिनानिमित्त दिल्या शुभेच्छा*
- *महिलांचा सन्मान होणे आवश्यक*
- *ऐरोली नॉलेज पार्कचा केला गौरव*
- *विजक्षेत्रात महिलांचे योगदान मोठे*
- *सर्व क्षेत्रात महिला आघाडीवर*

ऐरोली नॉलेज पार्क उपकेंद्राची स्थापित क्षमता १५० एम.व्ही.ए. (३x५० एम.व्ही.ए.चे रोहित्र) असून या उपकेंद्रास २x२२० के.व्ही.वाहिन्या व २२ के.व्ही. चे १२ फिडर्स जोडलेले आहेत. या उपकेंद्रामध्ये एक महिला उपकेंद्र प्रमुख, ३ महिला उपकार्यकारी अभियंता, २ महिला वरिष्ठ यंत्रचालक व ६ महिला तंत्रज्ञ कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच १ पुरुष उपकार्यकारी अभियंता व १ पुरुष कार्यदेशक देखील कार्यरत आहेत. या सर्व महिला कर्मचारी कर्तव्यदक्ष, प्रामाणिक, कार्यक्षम तर आहेतच पण उपकेंद्राची उपलब्धता ठेवण्यासाठी त्या कुठेच कमी पडत नाहीत, असा अनुभव या उपकेंद्राने दिला आहे. हा अनुभव यासाठी महत्त्वाचा आहे की मानवी विकासात तंत्रज्ञानाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ज्यांनी तंत्रज्ञानाचा स्वीकार केला, ते समूह पुढे गेले. स्त्री आणि पुरुष या दोन समूहाबाबतही पाहिले तर घराबाहेर जास्त काळ राहणाऱ्या पुरुष समूहाचा आणि तंत्रज्ञानाचा लवकर संबंध आला. पण, त्याने हे तंत्रज्ञान महिला वर्गापर्यंत पोहोचविले नाही. महिला दिन आणि बदलत्या जगात महिलांच्या समस्यांची चर्चा वाढू लागली. त्यातून तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचले पाहिजे, असा विचार वेळोवेळी मांडला जाऊ लागला. आता तर महिला पुरुषांच्या पुढे एक पाऊल जाऊन तंत्रज्ञान स्वीकारत आहेत. वाशी परिमंडळातील कळवा मंडळ अंतर्गत येणारे २२० के.व्ही.ऐरोली नॉलेज पार्क हे महिला उपकेंद्र झाले, हा असाच तंत्रज्ञानाचा स्वीकार होय.

अशी संवेदनशील आणि अवघड किंवा जोखीमीची मानली जाणारी कामे महिला सातत्याने करत आहेत, हे विशेष आहे. उदा. उपकेंद्रातील उपकरणाचे टेस्टिंग व डायग्नोस्टिक करताना रोहित्राच्या वर चढून बुशींगचे जंपर काढणे व लावणे, सर्किट ब्रेकर, लाईटनींग अरेस्टर, अर्थिंग रॉड टाकणे, सी.टी.,पी.टी.चे टॅन डेल्टा पॉईंट काढून टेस्ट करणे. तसेच उपकरणाच्या नियमित देखभालीची कामे जसे की, बे मेटेंनन्समधील हॉट स्पॉट अटेंड करणे म्हणजे नट बोल्ट टाईट करणे व बदलणे, आयसोलेटर व ब्रेकर ऑईलींग, ग्रीसींग करणे इ. कामे या महिला स्वतंत्रपणे करतात. अशा प्रकारे देखभालीची कामे करीत असताना त्या महिला तिन्हीही शिफ्टमध्ये ऑपरेशनची कामेसुद्धा सांभाळतात. सोबतच वितरण अधिकारी, कर्मचारी व ओपन ॲक्सेस ग्राहकांशी सुसंवाद साधून कंपनीचे उद्देश साध्य करत आहेत.

ऑक्टोबर २०१७ पासून म्हणजे गेले सहा महिने हे उपकेंद्र महिला चालवत आहेत आणि या सर्व काळात त्यांनी उपकेंद्राची उपलब्धताही कायम ठेवली आहे. या कालावधीमध्ये २२ के.व्ही. ब्रेकरचा पोल नादुरुस्त झाल्यानंतर त्यांनी स्वतंत्ररित्या तो बदलून नवीन पोल बसवून वीजपुरवठा लवकरात-लवकर चालू केला, अशीही घटना या काळात घडली आहे. याचा अर्थ त्या कुठेही कमी पडलेल्या नाहीत. या उदाहरणाने अशी कामे करण्याचा आत्मविश्वास महिला कर्मचाऱ्यांत वाढीस लागला आहे.

महिलांनी उपकेंद्र चालविण्याचा हा प्रकल्प जाणीवपूर्वक करण्यात आला आणि तो यशस्वी झाला. २२० के.व्ही.ऐरोली पार्क महिला उपकेंद्र नावारुपाला



**राजीव कुमार मित्तल (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

आले. या महिलांनी उपकेंद्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी व परिश्रम करून उपकेंद्राचे नाव उज्ज्वल केले आहे.

आपल्या कंपनीतही महिला पुढे सरसावल्या आहेत, असेच आता म्हणावे लागेल. रायगड जिल्ह्यातील उरणमध्ये झालेल्या क्रीडा स्पर्धेतही महिलांनी चांगली कामगिरी केली. विशेषतः कबड्डी, कॅरम, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुद्धीबळ यामध्ये महिलांनी केलेली कामगिरी विशेष नोंद घेण्यासारखी आहे. प्रशिक्षण शिबिरातही महिलांनी उल्लेखनीय कामगिरी केली. एवढेच नव्हे तर कार्यालयातील राज्य पारेषण उपक्रम, अभिकल्प, कंत्राटे व अनुश्रावक, संचलन व सुव्यवस्था, चाचणी स्वयंचलन आणि संचार विभाग, मानव संसाधन, वित्त, राज्य भार प्रेषण केंद्र, स्थापत्य, ईआरपी, कंपनी सचिव, दक्षता, विधी विभागात महिला चांगल्या कौशल्याने काम करीत आहेत.

अर्थात, ही वाटचाल येथेच थांबता कामा नये. या उदाहरणांवरून अधिकाधिक महिला पुढे येतील, त्या प्रेरणा घेतील आणि स्त्री आणि पुरुष खांद्याला खांदा लावून प्रत्येक गाव, तालुका, जिल्हा, राज्य आणि देश प्रकाशमान करतील, असा विश्वास वाटतो.

**शुभेच्छांसह..!**

**- राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**दीपनगर, जळगाव :** महानिर्मिती कंपनीच्या ६६० मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक वीज प्रकल्पाचे तसेच महापारेषण कंपनीच्या प्रस्तावित चार प्रकल्पांचे ई-भूमिपूजन महसूलमंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी जलसंपदामंत्री श्री. गिरीष महाजन, ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, आमदार श्री. एकनाथ खडसे, आमदार श्री. किशोर पाटील, श्री. अरविंद सिंह, श्री. बिपीन श्रीमाळी, श्री. संजीव कुमार, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल व अन्य मान्यवर.

## ■ जळगाव जिल्ह्यातील विविध प्रकल्पांचे भूमिपूजन ■

# विकासासाठी वीजप्रकल्प फायदेशीर : श्री. चंद्रकांत पाटील

■ *टीम महापारेषण जळगाव/नाशिक*

``भुसावळ तालुक्यातील दीपनगर येथे नव्याने उभारण्यात येणारा ६६० मेगावॅट क्षमतेचा वीजनिर्मिती प्रकल्प राज्याच्या विकासासाठी उपयुक्त ठरेल``, असे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांनी केले.

जळगाव जिल्ह्यातील दीपनगर येथे महानिर्मिती कंपनीच्या ६६० मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक वीज प्रकल्पाचे तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या २२० के.व्ही. उपकेंद्र केकतनिंभोरा, ता. जामनेर, २२० के.व्ही. उपकेंद्र विरोदा, ता. यावल, १३२ के.व्ही. उपकेंद्र कोठली, ता. भडगाव, १३२ के.व्ही. उपकेंद्र कर्की (पुर्नाड), ता. मुक्ताईनगर येथील उपकेंद्र आणि महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या आठ उपकेंद्राचे भूमिपूजन महसूलमंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जलसंपदामंत्री श्री. गिरीष महाजन होते. यावेळी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती उज्ज्वला पाटील, खासदार श्रीमती रक्षा खडसे, आमदार श्री. एकनाथ खडसे, आमदार श्री. संजय सावकारे, आमदार श्री. सुरेश भोळे, आमदार श्री. शिरीष चौधरी,आमदार श्री. किशोर पाटील, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. अरविंद सिंह, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल आदी उपस्थित होते.

श्री. चंद्रकांत पाटील म्हणाले , ``पाणी, वीज आणि रस्ते या पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात विकास करण्यात येत आहे. अशा सुविधांच्या विकासामुळे राज्याचे दरडोई उत्पन्न वाढते आहे. राज्यात सहा लाखाहून अधिक जीएसटी नोंदणी झाली आहे. या सुविधांवर खर्च केल्याने विविध गावांमध्ये विकास होऊन राज्याच्या उत्पन्नात वाढ होईल आणि जनता समृद्ध होईल. विकासाच्या माध्यमातून सुख-समृद्धी, आनंद आणि सुरक्षितता देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे``, असे त्यांनी सांगितले.

जलसंपदामंत्री श्री. गिरीष महाजन म्हणाले की, वीजनिर्मिती प्रकल्पामुळे विजेची समस्या दूर करण्याबरोबरच रोजगार निर्मितीसाठी चालना मिळेल. प्रकल्पाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या एकूणच विकासाला चालना मिळेल. प्रकल्पाचे काम करताना अनेकांना रोजगार मिळावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शासनाने विजेचे उत्तम नियोजन केल्याने राज्यात वीजपुरवठा चांगल्या प्रकारे होत असल्याचे त्यांनी सांगितले.

ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, केंद्राच्या सूचनेनुसार २५ वर्षापेक्षा जुने प्रकल्प टप्प्या-टप्प्याने बंद करण्यात येणार असून पर्यावरणाची हानी न करणारे प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. भुसावळ येथे उभारण्यात येणारा नवा प्रकल्प याच प्रकारचा आहे. जुन्या दराप्रमाणे काम होणार असल्याने ९०० कोटी रुपयांची बचत होणार आहे. प्रकल्प उभारताना प्रकल्पग्रस्तांना सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील. सीएसआरच्या माध्यमातून या भागाच्या विकासाला सहकार्य करण्यात येईल. तसेच ४२ महिन्यात प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. ते म्हणाले, केकतनिंभोरा हे देशातील सर्वात आधुनिक उपकेंद्र राहील. जिल्ह्यात विद्युत विकासाची एकूण ५ हजार कोटींची कामे हाती घेण्यात आली असून येत्या दीड वर्षात करण्यात येणाऱ्या महावितरणची ३२१ कोटींची आणि महापारेषणच्या २५० कोटींच्या कामांचा यात समावेश आहे.

शेतकऱ्यांना दिवसा वीज देता यावी यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरु करण्यात आली असून त्या माध्यमातून ३१ के.व्ही. वीज उपकेंद्रावर सौर ऊर्जा प्रकल्प सुरु करण्यात येणार आहे.

या वीज प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील नळ योजना आणि पथदिव्यांना देखील वीज जोडणी देण्यात येणार असल्याने ग्रामपंचायतींनी जागा उपलब्ध करुन द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. शेतकऱ्यांना थकित वीज बिलापोटी दंड व व्याज माफ करण्यात येणार असून बिलाची मूळ रक्कम शेतकऱ्यांनी भरावी, असे आवाहन त्यांनी केले. महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी यांनी प्रास्ताविकात भूमिपूजन करण्यात येणाऱ्या प्रकल्पांची माहिती दिली. प्रकल्पाच्या माध्यमातून विद्युत निर्मिती व वितरण व्यवस्था अधिक मजबूत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महापारेषणच्या नाशिक परिमंडळमार्फत उभारण्यात येणाऱ्या चार उपकेंद्र उभारणीनंतर जळगाव जिल्ह्यातील जामनेर, यावल, मुक्ताईनगर, व भडगाव तालुक्यातील अति उच्च दाबाच्या वाहिन्यांचे जाळे सक्षम होऊन, उच्च दाबाने अखंडित विद्युत पुरवठा होण्यास मदत होईल तसेच औद्योगिक, कृषी व घरगुती वीज ग्राहकांना योग्य दाबाने सुरळीत वीजपुरवठा होऊन जिल्ह्यातील विकास कामांना गती मिळेल. जामनेर, यावल, रावेर, चोपडा, मुक्ताईनगर, भडगाव, पाचोरा व चाळीसगाव या तालुक्यांसह व परिसरातील सुमारे ४०० गावांना लाभ होईल. घरगुती, कृषी,औद्योगिक व व्यावसायिक सुमारे ३ लाख विद्युत ग्राहकांना याचा फायदा होईल.



**नवी दिल्ली :** राज्यातील ऊर्जाविषयक विविध प्रश्नांबाबत श्रमशक्ती भवन येथे बैठक घेण्यात आली. त्याप्रसंगी केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. आर.के.सिंग, राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव कुमार मित्तल, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय कुमार तसेच केंद्रीय ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी.

## ■ ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती ■

# महाराष्ट्रातील ऊर्जानिर्मिती संदर्भातील विविध प्रश्न मार्गी लागतील

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्रातील महावितरण, महानिर्मिती, महापारेषणच्या संदर्भातील विविध प्रश्न मार्गी लागतील, अशी माहिती राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

नवी दिल्लीतील श्रमशक्ती भवन येथे केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री (स्वतंत्र पदभार) आर. के. सिंग यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील ऊर्जाविषयक विविध प्रश्नांबाबत बैठक घेण्यात आली. या बैठकीस राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव मित्तलमहावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय कुमार तसेच केंद्रीय ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

यावेळी महाजनकोच्या वीजनिर्मिती प्रकल्पांमध्ये प्रदूषण कमी करण्यासदर्भात अनेक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. यासाठी केंद्राकडून पर्यावरणाशी निगडित योजनांसाठी निधीची आवश्यकता असल्याचे सांगून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

महाराष्ट्र शासनाने 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' शेतक-यांसाठी सुरू केलेली आहे. याअंतर्गत शेतक-यांना दिवसा सौर ऊर्जा वाजवी दरावर पुरविण्यात येणार आहे. यासाठी महाजनको १५०० मेगावॅटचे फिडर उभारणार आहे. या प्रकल्पांच्या पायाभूत सुविधांसाठी लागणारा निधी उपलब्ध करून दयावा, अशी मागणी या बैठकीत करण्यात आली. यासह जागतिक बँकेकडून घेण्यात आलेला कर्जाचा परतावा करण्याची मुदत वाढवून मिळावी अशीही मागणी करण्यात आली.

जे ऊर्जा प्रकल्प वस्तू व सेवा लागू होण्यापूर्वी सुरू झाले होते अशा प्रकल्पांना वस्तू व सेवा करांपासून वगळण्यात यावे, अशी आग्रहाची विनंती केंद्रीय उर्जामंत्र्याकडे करण्यात आली. यावर केंद्रीय उर्जामंत्री यांनी हा विषय वस्तू व सेवा कर परिषदेकडे पाठविण्यात येईल, असे आश्वासन दिले.

महावितरण कंपनीला 'दीन दयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना'चा व 'एकात्मिक ऊर्जा विकास योजने' अंतर्गत निधी मिळावा. महापारेषणची क्षमता वाढविण्यासाठी निधी मिळण्याबाबत तसेच महानिर्मिती कंपनीच्या विविध समस्यांवरही या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. राज्याच्या ऊर्जा विभागाचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी बैठकीत सविस्तर चर्चा झाली असून याबाबत ऊर्जामंत्री श्री. बावनकुळे यांनी समाधान व्यक्त केले.



## *मुंबईत वीज परिवहन प्रणालीचे सक्षमीकरण*

मुंबईबाहेरून मुंबईपर्यंत ११०० मेगावॅट अतिरिक्त विजेचे पारेषण करण्याचे उद्दिष्ट पूर्ण.





श्री. अनिल थळे

## मैदानी खेळांच्या स्पर्धेत श्री. अनिल थळे व्दितीय

■ *टीम महापारेषण, मुंबई*

४२ व्या ऑल इंडिया इलेक्ट्रिसिटी स्पोर्टस कंट्रोल बोर्डच्या वतीने आयोजित केलेल्या मैदानी खेळांच्या स्पर्धेत महापारेषणचे श्री. अनिल रमेश थळे, सहाय्यक अभियंता, चाचणी विभाग, पनवेल, वाशी झोन यांनी ४०० मीटर धावणे या खेळात व्दितीय क्रमांकाचे रजत पदक पटकाविले.

पंजाबमधील एन.एस.सी. पटियाला येथे पार पडलेल्या स्पर्धेमध्ये मैदानी खेळांचे एकूण १६ प्रकार होते. यामध्ये देशातून एकूण १७ संघ सहभागी झाले होते. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून श्री. थळे यांना गौरविण्यात आले. या यशाबद्दल महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले.

महापारेषण कंपनीला मैदानी खेळात प्रथमच रजत पदक मिळाले आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून श्री. अनिल थळे यांना चार हजार रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल महापारेषण कंपनीकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.






**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेच्या ४१ व्या वार्षिक राज्यस्तरीय अधिवेशनात बोलताना महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे. शेजारी श्री. संजय ताकसांडे, श्री. संदेश हाके, श्री. योगेश गडकरी, श्री. किशोर परदेशी. श्री. अनंत पाटील.

### ■ एमएसईबी अधिकारी संघटनेचे अधिवेशन ■

# ‘विजक्षेत्रातील अधिकाऱ्यांची कामगिरी देशासाठी योगदान ठरेल‘

■ *टीम महापारेषण, कोल्हापूर*

``भविष्यात मनुष्यबळावर कौशल्याने वापर करावा लागणार आहे. यात माहिती तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विजक्षेत्रात अधिकाऱ्यांनी केलेली कामगिरी ही देशासाठी मोठे योगदान ठरेल``, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे (महापारेषण) मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेचे ४१ वे वार्षिक राज्यस्तरीय अधिवेशन कोल्हापूर येथे पार पडले. अधिवेशनाचे उद्घाटन महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पुणे महावितरणचे प्रादेशिक संचालक श्री. संजय ताकसांडे, महावितरणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. संदेश हाके, महावितरणचे कार्यकारी संचालक, माहिती, तंत्रज्ञान व ग्राहक सेवाचे श्री. योगेश गडकरी, श्री. एम.जी.शिंदे, श्री. किशोर परदेशी, डॉ. संजीब रॉय, श्री. सतीश तळणीकर, महापारेषणचे महाव्यवस्थापक (मा.सं., मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, म.रा.वि.मं अधिकारी संघटनेचे कार्याध्यक्ष तथा महापारेषणचे सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. मंगेश शिंदे, संघटनेचे उपसरचिटणीस व महापारेषणचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. सतीश जाधव, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील उपस्थित होते.

श्री. सुगत गमरे म्हणाले, ``विजक्षेत्रात आता नव्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. यासाठी संघटनेची शक्ती कामाला येईल. त्यासाठी सर्व अधिकारी एकजुट, संघटित राहतील, अशी आशा आहे. संघटना म्हणजे आरसा आहे. सोशल ऑडिट करण्याचे काम संघटना करते.``

श्री. अनंत पाटील म्हणाले, ``वैयक्तिक प्रश्नांपेक्षा सामूहिक प्रश्नांसाठी संघटना आवश्यक आहे. मेडिक्लेम योजना सुरु आहे. संघटनेने सुचविलेले बदल व्यवस्थापनापुढे मांडू`` कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. दिलीप शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन श्री. विकास आढे यांनी केले तर श्री. चेतन रोटे यांनी आभार मानले. अधिवेशनाला महापारेषण, महावितरण व महानिर्मिती कंपनीतील पाचशेहून अधिक अधिकारी उपस्थित होते.

## कार्यकारिणीची फेरनिवड



श्री. मंगेश शिंदे



श्री. सतीश जाधव

व्दितीय सत्रात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीची बिनविरोध फेरनिवड करण्यात आली. अध्यक्षपदी डॉ.संजीब रॉय, सरचिटणीस डी.आर.शिंदे तर महापारेषणच्या कार्याध्यक्षपदी श्री. मंगेश शिंदे यांची तर उपसरचिटणीसपदी श्री. सतीश जाधव यांची फेरनिवड करण्यात आली. ही निवड पुढील दोन वर्षासाठी आहे.

■ वीजपुरवठा सुरळीत होणार ■

# १३२/३३ के.व्ही. उपकेंद्र सेनगावचे लोकार्पण

■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*

महापारेषण कंपनीतर्फे १३२/३३ के.व्ही. उपकेंद्र सेनगावचे (जि.हिंगोली) लोकार्पण राज्याचे ऊर्जामंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा हिंगोलीचे पालकमंत्री श्री. दिलीप कांबळे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार श्री. तानाजी मुटकुळे, आमदार श्री. रामराव वडकुते, जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती शिवराणी नरवाडे उपस्थित होते.

महापारेषण कंपनीतर्फे १३२/३३ के.व्ही. उपकेंद्र सेनगाव येथील २x२५ एम.व्ही.ए. चे रोहित्र व संलग्नित बे आणि १३२ के.व्ही.हिंगोली-सेनगाव व्दिदल वाहिनी उपकेंद्राकरिता काम पूर्ण झाले आहे. विजेच्या वाढत्या मागणीमुळे आणि कमी दाबाने पुरवठा होत असल्याने सेनगाव तालुका परिसरामध्ये विजेचा दाब व सुरळीत वीजपुरवठा या उपकेंद्रामुळे होणार आहे.

कार्यक्रमास महापारेषणचे संचालक (संचलन) सर्वश्री गणपत मुंडे, औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता अविनाश कोंडावार, अधीक्षक अभियंता अनिल भारसाकळे, शामकांत वसेकर, महेंद्र वाळके यांचेसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**सेनगाव (जि.हिंगोली) :** महापारेषणच्या १३२/३३ के.व्ही. उपकेंद्राचे लोकार्पण करताना ऊर्जामंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे, सामाजिक न्याय राज्यमंत्री श्री. दिलीप कांबळे, आमदार श्री. तानाजी मुटकुळे, आमदार श्री. रामराव वडकुते, जि. प. अध्यक्षा श्रीमती शिवराणी नरवाडे.

# सांघिक सामाजिक जबाबदारी उपक्रमातून संगणक भेट

## सामाजिक उपक्रम




**पारनेर, जि.अहमदनगर :** महापारेषण कंपनीच्या वतीने सांघिक सामाजिक जबाबदारी (Corporate Social Responsibility) उपक्रमातून महाविद्यालयांना संगणक भेट देण्यात आले. याप्रसंगी महापारेषणचे अधिकारी व महाविद्यालयातील कर्मचारी.

■ *टीम महापारेषण, नाशिक*

महापारेषण कंपनीच्या वतीने सांघिक सामाजिक जबाबदारी (Corporate Social Responsibility) उपक्रमातून अहमदनगर जिल्हा पारनेर तालुक्यातील हंगे येथील न्यू इंग्लिश स्कूल व कान्हूर पठार येथील जनता विद्यामंदिर सायन्स व आर्ट ज्युनिअर कॉलेजमध्ये अनुक्रमे २० व १२ संगणक भेट देण्यात आले. तसेच संगणक कक्ष उभारणीकरिता आवश्यक इतर साहित्य (युपीएस, लेझर प्रिंटर, मल्टिमीडिया, प्रोजेक्टर, स्क्रीन, टेबल व खुर्च्या) योजनेअंतर्गत कंपनीमार्फत देण्यात आले.

या दोन्ही विद्यालयांकडे आवश्यक संगणक सुविधांचा अभाव असल्याने अनेक विद्यार्थी संगणकीय ज्ञानापासून वंचित होते. यासाठी महापारेषणकडून १३ लाख ५६ हजार रुपये मंजूर करण्यात आले. कंपनीच्या मदतीने सुमारे १५०० विद्यार्थ्यांना सुसज्ज तंत्रज्ञानाची सुविधा उपलब्ध करण्यासाठी मदत झाली आहे. याप्रसंगी अऊदा संवसु मंडळ नाशिकचे अधीक्षक अभियंता श्री. किशोर जाधव व व्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुनील दिवसे उपस्थित होते.






**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** जागतिक महिला दिनानिमित्त महापारेषणमध्ये महिलांना मार्गदर्शन करताना कोरो इंडिया या स्वयंसेवी संस्थेच्या प्रकल्प समन्वयक श्रीमती सुजाता लव्हांदे. दुसऱ्या छायाचित्रात बोलताना सर्वश्री सुगत गमरे, सुधीर वानखेडे, अनंत पाटील, राजू गायकवाड.

## ■ महापारेषणमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात ■

# स्त्रियांवरील अत्याचार रोखण्यासाठी महिलांनी पुढे यावे : लव्हांदे

■ *टीम महापारेषण, मुंबई*

``कार्यालयात महिला-पुरुष असा भेद असता कामा नये. त्यासाठी कार्यालयात लिंगसमानता असायला हवी. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ रोखण्यासाठी महिलांनी आता न घाबरता पुढे यायला हवे``, असे मत कोरो इंडिया स्वयंसेवी संस्थेच्या प्रकल्प समन्वयक श्रीमती सुजाता लव्हांदे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) जागतिक महिला दिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कार्यालयीन ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळापासून प्रतिबंध, संरक्षण आणि तक्रार निवारणासाठी विशाखा समितीची स्थापना केली आहे. त्याबद्दल महिलांमध्ये जाणीवजागृती करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे उपस्थित होते. याप्रसंगी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे उपस्थित होते.





श्रीमती लव्हांदे पुढे म्हणाल्या, ``कामाच्या ठिकाणी महिलांनी कोणतीही शेरेबाजी, स्पर्श खपवून घेऊ नये. त्याविरोधात तक्रार नोंदवावी. प्रत्येक कार्यालयाने महिलांसाठी तक्रारपेटी ठेवावी. पुरुषांनीही महिलांना त्रास होईल, असे वर्तन करू नये.``

सुरवातीला जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन श्री. सुगत गमरे म्हणाले, ``महापारेषणमध्ये महिलांना काम करण्यासाठी चांगले वातावरण आहे. महिलांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी आणखी प्रयत्न केले पाहिजेत. कार्यालयामध्ये महिलांना असुरक्षितता वाटू नये.``

श्री. अनंत पाटील म्हणाले, ``जीवन पूरक असावं. महिलांनी सन्मानानं जगावं. प्राचीन काळापासून महिलेला सन्मान आहे. तो कायम तसाच राहिला पाहिजे.``

श्री. राजू गायकवाड म्हणाले, ``छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलांविषयीचे विचार थोर होते. त्यांचे विचार आपण आचरणात आणण्याची गरज आहे.``

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्रीमती बीना खोत यांनी केले. यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धात्मक खेळांचे आयोजन केले होते. त्यामध्ये सर्व महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

### ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रतिक्रिया

# ऊर्जाक्षेत्र मजबूत व रोजगारनिर्मिती करणारा अर्थसंकल्प

**टीम महापारेषण, मुंबई**

शासनाच्या विविध योजना व प्रकल्पातून रोजगार निर्मिती करणारा तसेच ऊर्जा क्षेत्राला मजबूत करणारा व सौर ऊर्जेला प्रोत्साहन देणारा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली.

कृषी क्षेत्रासाठी विविध योजना जाहीर करून शेतकऱ्यांचे उत्पादनवाढीचे प्रयत्न या अंदाजपत्रकातून करण्यात आला आहे. बेरोजगार तरुणांना जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्या व उद्योजक तरुणांना उद्योगांसाठी कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी विचार अर्थसंकल्पात करण्यात आलं आहे.

उर्जाक्षेत्र मजबूत करण्याच्या दृष्टीने ऊर्जा विभागासाठी ७२३५ कोटींची तरतूद या अर्थसंकल्पात अर्थमंत्रांनी केली आहे. विजेच्या पायाभूत सुविधांसाठी ३६५ कोटी, कृषिपंपाचा अनुशेष भरून काढण्यासाठी ५० कोटी, विदर्भ मराठवाडा कृषीपंपाच्या विद्युतीकरणासाठी ७०० कोटी, कृषी व यंत्रमागविषयक प्रशुल्क कमी करण्यासाठी महावितरणला ४९४१ कोटीच्या अर्थसहाय्यची तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.



> *विजेच्या पायाभूत सुविधांसाठी ३६५ कोटी, कृषिपंपाचा अनुशेष भरून काढण्यासाठी ५० कोटी, विदर्भ मराठवाडा कृषीपंपाच्या विद्युतीकरणासाठी ७०० कोटी, कृषी व यंत्रमागविषयक प्रशुल्क कमी करण्यासाठी महावितरणला ४९४१ कोटीच्या अर्थसहाय्यची तरतूद.*

महानिर्मितीद्वारे राबवण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी ४०४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यात कोराडी युनिट ६ चे आधुनिकीकरण, भुसावळ प्रकल्पात भांडवली गुंतवणूक, सौर ऊर्जा प्रकल्पात भांडवली गुंतवणूक (२०० कोटी) या प्रकल्पांचा समावेश आहे, असे ही ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

---

### बर्धन क्रिकेट स्मृती चषक

# इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनच्या स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**टीम महापारेषण, मुंबई**

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन कल्याण परिमंडळाच्या वतीने कॉ. ए.बी.बर्धन यांच्या स्मरणार्थ आयोजिलेल्या क्रिकेट स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे यांच्या हस्ते झाला. यंदाच्या वर्षी तब्बल ३६ संघांनी आपला सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे उदघाटन महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संघटनेचे सरचिटणीस कॉ. कृष्णा भोयर होते. सुरवातीला महापारेषण कंपनीचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण व महावितरण कंपनीचे उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. ललित गायकवाड यांच्या हस्ते कॉ.ए.बी. बर्धन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

पारितोषिक वितरण समारंभ महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे यांच्या हस्ते झाले. यावेळी महापारेषण कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, संघटनेचे संयुक्त सचिव कॉ. टी.सी.भोईर, केंद्रीय सल्लागार कॉ. जे.आर. पाटील, केंद्रीय सदस्या सौ.भारती भोयर, सौ.उमा निपाणे, सौ. रेवती धादवड, कल्याण झोनल अध्यक्ष कॉ.विजय बोरसे, झोनल सचिव कॉ. विलास मार्के, भांडुप झोन अध्यक्ष कॉ. डी.जे. कांबळे, झोनल संघटक कॉ. गोरखनाथ पवार, कल्याण सर्कल सचिव कॉ. औदुंबर कोकरे, कॉ. संतोष चचाणे, कॉ. गजानन तिडके, वरिष्ठ वीज कामगार नेते कॉ. शाम म्हात्रे, कॉ. हरिश्चंद्र ठाकूर उपस्थित होते. प्रारंभी सरचिटणीस कॉ. कृष्णा भोयर यांनी प्रास्ताविक केले तर कॉ. औदुंबर कोकरे यांनी आभार मानले.




**कल्याण :** महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन कल्याण परिमंडळाच्या वतीने कॉ. ए.बी.बर्धन यांच्या स्मरणार्थ आयोजिलेल्या क्रिकेट स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात बोलताना श्री. अनंत पाटील. शेजारी श्री. गणपत मुंडे, श्री. सुगत गमरे, कॉ. कृष्णा भोयर, कॉ. टी.सी. भोईर, कॉ. जे.आर.पाटील व अन्य मान्यवर.



■ मिळून साऱ्याजणी..! ■

# २२० के.व्ही. ऐरोली नॉलेज पार्कमध्ये महिलाराज

■ टीम महापारेषण, वाशी/कळवा

जगात स्त्रिया या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला-खांदा लावून काम करताना दिसतात. त्याचप्रमाणे आपल्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळून तेवढ्याच तत्परतेने आपल्या कार्यक्षेत्रात उत्कृष्ट कार्य करताना व एक आदर्श जीवन जगताना दिसत आहेत. याचे प्रत्यक्षातील उदाहरण म्हणजे वाशी परिमंडळातील कळवा मंडळ अंतर्गत येणारे २२० के.व्ही.ऐरोली नॉलेज पार्क महिला उपकेंद्र आहे.

ऐरोली नॉलेज पार्क उपकेंद्राची स्थापित क्षमता १५० एम.व्ही.ए. (३x५० एम.व्ही.ए.चे रोहित्र) असून या उपकेंद्रास २x २२० के.व्ही. वाहिन्या व २२ के.व्ही.चे १२ फिडर्स जोडलेले आहेत. या उपकेंद्रामध्ये एक महिला उपकेंद्रप्रमुख, ३ महिला उपकार्यकारी अभियंता, २ महिला वरिष्ठ यंत्रचालक व ६ महिला तंत्रज्ञ कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच १ पुरुष उपकार्यकारी अभियंता व १ पुरुष कार्यदेशक देखील कार्यरत आहेत.


आजपर्यंत जी कामे फक्त पुरुषांकडून केली जात होती. ती कामे येथील महिला करीत आहेत. उपकेंद्रातील उपकरणाचे टेस्टिंग व डायग्नोस्टिक करताना रोहित्रांच्या वर चढून बुशींगचे जंपर काढणे व लावणे, सर्किट ब्रेकर, लाईटनींग अरेस्टर, अर्थिंग रॉड टाकणे, सी.टी.,पी.टी.चे टॅन डेल्टा पॉईंट काढून टेस्ट करणे. तसेच उपकरणाच्या नियमित देखभालीची कामे बे मेटेंनन्समधील हॉट स्पॉट अटेंड करणे म्हणजे नट बोल्ट टाईट करणे व बदलणे, आयसोलेटर व ब्रेकर ऑईलींग,



ग्रीसींग करणे ही कामे या महिला स्वतंत्रपणे करत आहेत. या महिला तिन्हीही शिफ्टमध्ये ऑपरेशनची कामेसुद्धा सांभाळत आहेत. सोबत वितरण अधिकारी, कर्मचारी व ओपन ॲक्सेस ग्राहकांशी सुसंवाद साधून कंपनीचे उद्देश साध्य करत आहेत.

ऑक्टोबर २०१७ पासून हे उपकेंद्र महिला चालवत असताना त्यांनी उपकेंद्राची उपलब्धताही कायम ठेवली आहे. या सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये २२ के.व्ही.ब्रेकरचा पोल नादुरुस्त झाल्यानंतर त्यांनी स्वतंत्ररित्या तो बदलून नवीन पोल बसवून वीजपुरवठा तत्काळ चालू केला.

प्रबळ इच्छाशक्तीने आपण काहीही करू शकतो, हेच या महिला सिध्द करीत आहेत. यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन इतर उपकेंद्रातील महिलांनाही एक प्रेरणा मिळाली आहे. अधीक्षक अभियंता सौ. जुईली वाघ, कार्यकारी अभियंता श्री. अरविंद भगत व उपकेंद्र प्रमुख सौ. कविता तितरे यांच्या मार्गदर्शनाने महिला उत्कृष्टपणे काम करत आहेत. या महिलांनी उपकेंद्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी व परिश्रम करुन उपकेंद्राचे नाव उज्वल केले आहे.



## ईएचव्ही वाहिनी, मनोऱ्यासाठी भूसंपादनाचे नूतन धोरण

मनोऱ्यासाठी संपादित केलेल्या जमिनीसाठी रेडिरेकनरच्या दराच्या दुप्पट दराने भरपाई.





# छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती `महापारेषण`मध्ये उत्साहात

■ *टीम महापारेषण, मुंबई*


महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) छत्रपती शिवाजी महाराज यांची ३८८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. संजय कुमार, कार्यकारी अभियंता श्री. मोहन ननवरे, कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. महेंद्र वाकळे, श्री. रोशन राठोड यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री. श्रीकांत पेटकर यांची दोन पुस्तके प्रकाशित

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महापारेषणच्या मुख्यालयात राज्य पारेषण उपक्रम (STU) या विभागात कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता श्री. श्रीकांत पेटकर यांची ``चांगुलपणा अवतीभवती`` आणि ``कविता मनातल्या`` ही दोन पुस्तके नुकतीच प्रकाशित झाली आहेत. समाजात चांगले काम करणाऱ्या लोकांच्या मुलाखती घेऊन त्यांचे कार्य `चांगुलपणा अवतीभवती` या पुस्तकात मांडले आहे. प्रसिध्द संगीतकार श्री. कौशल इनामदार यांच्या हस्ते सदर पुस्तकाचे प्रकाशन झाले. तसेच वर्तमानातील घडामोडीवर भाष्य करणाऱ्या `कविता मनातल्या` या कवितासंग्रहात आहेत.



**मुंबई :** महापारेषणचे कार्यकारी अभियंता आणि लेखक श्री. श्रीकांत पेटकर यांच्या `चांगुलपणा अवतीभवती` या पुस्तकाचे प्रकाशन प्रसिध्द संगीतकार आणि गायक श्री. कौशल इनामदार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी डावीकडून श्री. सुदेश हिंगलासपूरकर, संगीतकार श्री. इनामदार, लेखक श्री. श्रीकांत पेटकर, निवेदिका सौ. पांडे.



## ‘महापारेषण’ची घोडदौड

आदिवासीबहुल भागात उत्तम प्रकारच्या वीज पारेषणासाठी राळेगाव, जव्हार, धडगाव, आलापल्ली व विरोदा येथे नवीन उपकेंद्रांची स्थापना.





सिल्व्हासा : वरिष्ठ अभियंत्यांसाठी आयोजिलेल्या कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी महापारेषण कंपनीचे अधिकारी.

# सिल्व्हासा येथे वरिष्ठ अभियंत्यांसाठी कार्यशाळा

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

महापारेषण कंपनीच्या वरिष्ठ अभियंत्यांसाठी सिल्व्हासा येथे ``HTLS Conductor Application and Installation Technique`` या विषयावर दोन दिवसांची निवासी कार्यशाळा घेण्यात आली. सिल्व्हासा येथील JSK Industries Pvt. Ltd या कंपनीने या कार्यशाळेचे आयोजन केले होते. यामध्ये महापारेषण कंपनीच्या २० वरिष्ठ अभियंत्यांनी सहभाग नोंदविला. मुख्य अभियंते सर्वश्री रोहिदास मस्के, जयंत विके, श्रीराम भोपळे, अविनाश कोंडावार, श्रीकांत राजूरकर, राजेंद्र गायकवाड यांच्यासह अन्य वरिष्ठ अभियंत्यांची उपस्थिती होती. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी JSK Industries Pvt. Ltd कंपनीतर्फे श्री. राजेश मिश्रा व श्री. पंकज कदम यांनी पुढाकार घेतला होता.



चंद्रपूर : प्रगत कुशल योजनेअंतर्गत पदवी व पदविकाधारक बेरोजगार विद्युत अभियंत्यांच्या अभ्यासक्रमाच्या समारोपप्रसंगी सर्वश्री संजय अत्राम, अविनाश निंबाळकर, शशिकांत बाकरे, अविनाश वट्टी, दीनेश खोंडे, प्रदीप चामट.

# बेरोजगार विद्युत अभियंत्यांच्या अभ्यासवर्गाचा चंद्रपुरात समारोप

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

महापारेषणच्या सांघिक सामाजिक जबाबदारी व प्रगत कुशल योजनेअंतर्गत पदवी व पदविकाधारक बेरोजगार विद्युत अभियंत्यांच्या अभ्यासक्रमाचा समारोप चंद्रपुरात झाला.

महाराष्ट्र शासनाने बेरोजगार पदवी/पदविकाधारक विद्युत अभियंत्यांना स्वयंरोजगार करणे सुकर व्हावे, यासाठी विद्युत पर्यवेक्षक क्षमता प्रमाणपत्र देण्यासाठी बारा आठवड्याच्या विद्युत सुरक्षा व संचमांडणी आराखडा अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे. हा अभ्यासक्रम महापारेषण, महानिर्मिती, महावितरण बीईएसटी, टाटा पावर व रिलायन्स एनर्जी लिमिटेड या कंपन्यांच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये राबविण्यात येत आहे. या अभ्यासवर्गाच्या समारोपप्रसंगी अधीक्षक अभियंता व केंद्रप्रमुख सर्वश्री संजय अत्राम, अधीक्षक अभियंता (प्रकल्प) अविनाश निंबाळकर, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) शशिकांत बाकरे, कार्यकारी अभियंता अविनाश वट्टी उपस्थित होते. नागपूर प्रादेशिक विद्युत निरीक्षणातर्फे अधीक्षक अभियंता (विद्युत) श्री. दीनेश खोंडे, विद्युत निरीक्षक श्री. प्रदीप चामट, सहाय्यक अभियंता सौ. अपर्णा हिंगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार केंद्र समन्वयक श्री. उमेश शेंडे यांनी मानले.

# सहाय्यक अभियंत्यांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण



**भाईंदर :** महापारेषणच्या सहाय्यक अभियंत्यांसाठी आयोजिलेल्या दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिरात अभियंत्यांसोबत महापारेषण कार्यालयातील अधिकारी वर्ग.

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

महापारेषणच्या सरळसेवा भरतीव्दारे नियुक्त केलेल्या सहाय्यक अभियंत्यांसाठी `नो युवर कंपनी` (Know your company) या विषयावर भाईंदर येथील रामभाऊ म्हाळगी प्रशिक्षण प्रबोधिनीत दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण घेण्यात आले. प्रशिक्षणाचे उदघाटन महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे व इतर अधिकारी उपस्थित होते.

या प्रशिक्षणामध्ये महापारेषण कंपनीतील विविध विभागांच्या कार्यपध्दतीसंबंधी माहिती देण्यात आली. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर, श्री. श्रीराम भोपळे, श्री. आर.एल.गायकवाड, श्री. श्रीकांत राजूरकर, कंपनी सचिव कु.विनीता श्रीवाणी, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. संजय कुमार, महाव्यवस्थापक (विवले) श्री. सुनील दत्त शर्मा, अधीक्षक अभियंते सर्वश्री डी.के.रोकडे, बी.एच.बल्हाळ, महेश भागवत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणात सांघिक कार्यालय, वाशी परिमंडळ व नाशिक परिमंडळ येथे कार्यरत असलेल्या पारेषण व दूरसंचार शाखेच्या ४६ सहाय्यक अभियंत्यांनी सहभाग नोंदविला. कार्यकारी अभियंता (प्रशिक्षण) श्री. विनायक बुरलीकर व प्रबोधिनीचे श्री. संजय महाडिक यांनी कार्यक्रमाचे समन्वयन केले. कार्यक्रमाचे शेवटी अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) श्री. शशिकांत बाकरे यांनी आभार मानले.



**कोची :** श्री. सुगत गमरे यांचे स्वागत करताना पॉवरग्रीडचे प्रतिनिधी.



**कोची :** पॉवरग्रीडच्या वतीने आयोजिलेल्या दोन दिवसीय कार्यशाळेत `रिस्पॉन्सिबल ट्रेड युनियन` या विषयावर अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे फेब्रुवारी-मार्च २०१८

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. राजीव मुकुंद देव | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा, संवसु मंडळ, अकोला | ३१.०३.२०१८ |

*From the Desk of ED, HR*

# ध्येयपूर्तीचा आनंद आणि टीमवर्क



आपण सर्व सहकारी एकत्र येऊन विशिष्ट काम करतो आणि त्याला एक सामूहिक नाव मिळते. त्या नावाशी आपण जोडले जातो. व्यक्ती एकत्र येऊन समाज बनतो आणि समाजाची एक ओळख तयार होते. संस्था, कंपनीचेही तसेच असते. आपण एखाद्या संस्थेच्या किंवा कंपनीच्या कामासाठी एकत्र येतो आणि ती संस्था किंवा कंपनी आपली ओळख बनते. ही प्रक्रिया अतिशय महत्त्वाची आहे. जी टीमवर्कशिवाय पुढे जाऊ शकत नाही.

टीमवर्क ही आपोआप घडणारी बाब नाही. तिच्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. सोप्या आणि वेगळ्या शब्दांत सांगायचे तर टीमवर्क एखाद्या क्रिकेट टीमसारखे असते. विजय मिळविण्यासाठी टीममधील प्रत्येकाचा वाटा असतो आणि त्याशिवाय टीम यशस्वी होत नाही. टीममधील एका जरी खेळाडूने साथ दिली नाही तर विजय निसटू शकतो, असे आपण अनेकदा पाहतो. आपल्या क्षेत्रात टीमवर्कला एवढे महत्त्वाचे स्थान आहे. क्रिकेटमध्ये आपण त्या-त्या वेळी वेगवेगळ्या भूमिकेत टीमला विजयाच्या दिशेने जाण्यासाठी पुढे नेत असतो. कधी आपण फलंदाज, कधी गोलंदाज, कधी क्षेत्ररक्षक, कधी यष्टीरक्षक असतो, पण ती प्रत्येक भूमिका टीमच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावत असते.

आता आपण आपल्या कंपनीच्या संदर्भात विचार करायचा तर असे म्हणू शकतो की आपल्याला टीमवर्कसाठी एक ध्येय लागते. (Common Goal) चांगली सेवा देणे, हे आपले ध्येय आहे. त्यामुळे सर्वांचे हे एकच 'लक्ष्य' असणे आवश्यक आहे. त्यासाठी सगळ्यांची ऊर्जा एकत्रित केली पाहिजे. त्यासाठी विभागप्रमुखांची जबाबदारी अधिक असते. त्यांनी सहकाऱ्यांना वेळोवेळी मदत व मार्गदर्शन केले पाहिजे. दुसरे म्हणजे आपण जे काम करत आहोत, त्यात अनेक अडचणी असतात. दररोज नवे प्रश्न निर्माण होतात. पण, या अडचणी आणि प्रश्न हे तात्पुरते असतात, दीर्घकालीन ध्येयाच्या तुलनेत त्याकडे पाहिले की त्याचे स्वरूप किरकोळ असते, असे आपल्या लक्षात येईल. त्यामुळे ते सोडविताना सकारात्मक वातावरण बिघडणार नाही, याची काळजी आपल्याला घेतली पाहिजे. अनेकदा असे होते की एखादे काम सांगितले की त्यात किती अडचणी आहेत, याकडे आपले लक्ष जाते. सुरवातीला एकट्याच्या दृष्टीने त्या अडचणी असतात, हे खरेच आहे. पण आपण त्या सोडविताना टीम म्हणून प्रयत्न करणार आहोत, असा विचार केला की आपली चिंता कमी होते, असेही आपण अनुभवले असेल. ही टीमवर्कची ऊर्जा हेच त्यावरचे उत्तर असते. ही ऊर्जा कमी होणार नाही, याची काळजी विभागप्रमुखांनी घेतली पाहिजे.

चांगल्या टीमवर्कमध्ये महत्त्व असते ते काम करणाऱ्या सहकाऱ्याला प्रोत्साहन देणे, कामाचे श्रेय देताना एका विशिष्ट सहकाऱ्याचा आणि टीमचा उल्लेख करणे, टीममधील सहकाऱ्यांत सतत संवाद राहील, असा प्रयत्न करणे आणि ध्येय साध्य झाल्याचा आनंद सर्वांनी मिळून, एकत्र येऊन साजरा करणे. हे सर्व जाणीवपूर्वक केले गेले पाहिजे.

टीमवर्कमध्ये शिस्तीला अतिशय महत्त्व आहे, त्यामुळे शिस्तीची संस्कृती रुजविणे, हे फार महत्त्वाचे असते. अर्थात, शिस्त म्हणजे जाच नव्हे. कामाच्या वेळी शिस्तीची सतत आठवण आणि काम संपले की सहज संवाद असला की शिस्त ही जाच वाटत नाही. त्यासाठी आपण सहकारी म्हणून एकत्र आलेलो आहोत आणि ध्येयाकडे जाणारी सर्व कामे महत्त्वाची आहेत, असे वातावरण तयार केले पाहिजे.

कोणतेही आव्हान आपण आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने पेलू शकतो. त्याकरिता उत्कृष्ट संवाद, समन्वय व सर्वांना सामावून घेण्याचे कौशल्य सहकाऱ्यांमध्ये बिंबवणं गरजेचे असते. आपल्या सहकाऱ्यांचा उत्साह वाढविण्यासाठी त्यांना सतत प्रोत्साहित केले पाहिजे. तसेच त्यांना लक्ष्यपूर्तीसाठी प्रेरित करून त्यांचा आनंद द्विगुणित केला पाहिजे. वेळप्रसंगी सहकाऱ्यांचे प्रबोधन करून त्यांच्यातील चांगल्या गुणांचा कौशल्याने वापर केला पाहिजे. आपणास जे माहिती आहे ते सहकाऱ्यांस सांगितले तर त्यांच्या ज्ञानामध्ये भर पडू शकेल. पर्यायाने त्यांच्या कार्यकुशलतेमध्ये भरीव वाढ होण्यास मदत होईल.

ध्येय साध्य करण्यासाठी टीमवर्कशिवाय पर्याय नाही, हे एकदा लक्षात आले की टीम बांधणे, हे महत्त्वाचे ठरते. ती बांधण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्नांची गरज आहे कारण टीमवर्कने साध्य केलेल्या ध्येयपूर्तीचा आनंद काही वेगळाच असतो!

**शुभेच्छांसह..!**

**- सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**


संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.


The Company accepts no responsibility for the matter published in the journal.